राज्यातील प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे,ठाणे,नागपूर, रत्नागिरी व वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, अंबेजोगाई जि.बीड यांना स्थानिक स्तरावर औषध, आंतरवस्त्र, लिनन व प्रयोगशाळा साहित्य व रसायने व किरकोळ यंत्र व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी रुपये ३०,८१,९००/- इतके अनुदान वितरीत करुन खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः निधीवि-४८२६/प्र.क्र.९८/खरेदी कक्ष
गोकुळादास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०९.०४.२०२६
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.२०.०५.२०२६
३) अतिरीक्त संचालक, (आरोग्य संस्थेमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र क्र.आआसे/माआ/टे-४/निधी वितरण/७१२०-२६/२६, दि.२५.०५.२०२६

प्रस्तावना:-

अतिरीक्त संचालक, (आरोग्य संस्थेमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई यांनी वाचा येथील दिनांक २५.०५.२०२६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे, ठाणे, नागपूर, रत्नागिरी व वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, अंबेजोगाई जि.बीड यांना स्थानिक स्तरावर औषध, आंतरवस्त्र, लिनन व प्रयोगशाळा साहित्य व रसायने व किरकोळ यंत्र व साधनसामुग्री खरेदी लेखाशीर्ष २२१० ०२१७, २१-पुरवठा व सामग्री, लेखाशीर्ष- २२१० ०२९१, २१-पुरवठा व सामग्री व लेखाशीर्ष-४२१० १११९, ५२-यंत्र व साधन सामग्री या उद्दिष्टांतर्गत रु.३०,८१,९००/-इतके अनुदान वितरीत करुन खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यातील प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे, ठाणे, नागपूर, रत्नागिरी व वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, अंबेजोगाई जि.बीड या कार्यालयांना स्थानिक स्तरावर औषध, आंतरवस्त्र, लिनन व प्रयोगशाळा साहित्य व रसायने व किरकोळ यंत्र व साधनसामुग्री खरेदी लेखाशीर्ष २२१००२१७, २१-पुरवठा व सामग्री, लेखाशीर्ष- २२१००२९१, २१-पुरवठा व सामग्री व लेखाशीर्ष-४२१० १११९, ५२-यंत्र व साधन सामग्री या उद्दिष्टांतर्गत रु.३०,८१,९००/- इतका निधी प्रचलित नियम व विहित कार्यपध्दतीने खर्च करण्यास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	लेखाशीर्ष	उदिष्ट	अर्थसंकल्पीय तरतुद	मागणी	वितरीत करण्यात आलेला निधी
१	२	३	४	६	७
१	२२१००२१७	२१	४०.००	४०.००	१२.००
२	२२१००२९१	२१	६०.०	६०.००	१८.००
३	४२१०१११९	५२	२.७३	२.७३	०.८०
		एकूण	**१०२.७३**	**१०२.७३**	**३०.८१९**

२. प्रस्तुत सहायक अनुदानाची देयके कोषागारातून आहंरीत करण्यासाठी “प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय” यांना “आहंरण व संवितरण अधिकारी” व “सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई” यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम/भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ च्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ च्या भाग पहिला, उपविभाग-दोन मधील तरतुदीनुसार उक्त बाबींवरील खर्चाकरीता प्रशासकीय मान्यता घेणे अनिवार्य राहील.

४. शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III उद्योग-४, दिनांक ०१.०१.२०१६ नुसार प्रसिध्द केलेल्या सुधारीत नियमपुस्तिकेत विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी बाबत कार्यवाही करावी.

५. औषधी व साहित्य सामुग्रीची खरेदी राज्य औषधी सूची (एसडीएल), राज्य औषधी साहित्य सूची (एससीएल) तसेच राज्य अत्यावश्यक औषधी सूचीतील आवश्यक व किरकोळ यंत्रसामुग्री व सामुग्रींचीच खरेदी करण्यात यावी.

६. खरेदी करण्यात येणाऱ्या उपकरण/मशिनचे विनिर्देशन गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. तांत्रिक विनिर्देशन हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल, अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात आल्यानंतरच सदर बाबींची खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

७. सदर खरेदीसाठी वितरीत करावयाच्या देयकांची द्विरूक्ती होणार नाही तसेच निधी विहित कार्यपद्धतीने खर्च करण्याची तसेच सदर निधी ज्या प्रयोजनासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्याची संपूर्ण जाबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई व सहसंचालक, आरोग्य सेवा, खरेदी कक्ष, मुंबई व संबंधित कार्यालय प्रमुख यांची राहील.

८. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. २०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प, दि.२५.०४.२०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

९. या कामी होणारा खर्च, मागणी क्र.आर-१, (०५) मनोरुग्णलये (०५) (०१) मनोरुग्णालये (अनिवार्य), २१-पुरवठा व सामग्री (२२० ०२१७), मागणी क्र.आर-१ (०६) (२१) महसूल विभागाच्या मुख्यालयांच्या

ठिकाणी विभागीय संदर्भीय सेवा केंद्र स्थापन करणे (अनिवार्य), २१-पुरवठा व सामग्री (२२१० ०२९१) व मागणी क्र.आर-३, (०१) (०५) मध्यवर्ती मनोरुग्णालये (कार्यक्रम), ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री (४२१० १११९) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात येऊन तो सदरहू लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१०. सदर शासन निर्णय वाचा क्र.१ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, दि.०९.०४.२०२६ मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांस प्रदान करण्यात आलेले अधिकार तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५४१/२०२६/व्यय-१३, दि.२७.०७.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०३१०४६३५७४१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT HARIDAS WADE

Digitally signed by CHANDRAKANT HARIDAS WADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9474E7143B2BC3FD96E8D7BF07D1CE51DE8461D4C34AE1E3F643C11B54523936, cn=CHANDRAKANT HARIDAS WADE
Date: 2026.08.03 11:23:42 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
४) अतिरीक्त संचालक, (आरोग्य संस्थेमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई.
५) सह संचालक, आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
६) सहसंचालक, आरोग्य सेवा,(असंसर्गजन्य रोग),मुंबई
७) सह संचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
८) सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर),मुंबई.
९) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षण/लेखा अनुज्ञेयता),मुंबई /नागपूर.
१०) उपसंचालक, आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
११) वित्त विभाग (व्यय-१३/अर्थ-९), मंत्रालय, मुंबई.
१२) सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
१३) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
१४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१५) निवडनस्ती (खरेदी कक्ष)